महाराष्ट्र शासन

# डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,विष्णूपुरी,नांदेड

दुरध्वनी क्र. ०२४६२-२२९२७७ (प्र.अ.) दु.क्र.०२४६२-२२९२७४ (अधिष्ठाता)
फॅक्स क्र.०२४६२-२२९२७५ Email Id :- gmcnanded@rediffmail.com

जा.क्र.डॉशंचशावैमविनां/आनि/प्रबंधक/जाहीरात/ ८१५ /2026 दिनांकः-३०/०१/2026

## जाहिरात

**विषयः-** **डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड येथे मार्च-२०२६ ते ऑगस्ट-२०२६ या सत्रासाठी प्रबंधकांची पदे भरणे बाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाची मंजूर टिप्पणी दि.२८.०१.२०२६.

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड येथे खालील विवरणपत्रात दर्शविल्या प्रमाणे **मार्च-२०२६ ते ऑगस्ट-२०२६** या सत्रासाठी **प्रबंधकांची** रिक्त पदे भरण्यांकरिता योग्य त्या अर्हता प्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यासाठी खालील प्रमाणे जाहीरात देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र | इ.मा.व. | ईडब्ल्यू एस | एसई बिसी | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बालरोगशास्त्र | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ |
| २ | बधिरीकरणशास्त्र | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | ०२ |
| ३ | क्षकिरणशास्त्र | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ |
| ४ | त्वचा व गुप्तरोग | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ५ | मनोविकृत्तीशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ६ | नेत्ररोगशास्त्र | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | एकूण | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०८ |

सदरील पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील असून **फक्त ६ महिन्याच्या कालावधी करिता** भरण्यात येत आहेत.

**१) प्रबंधक पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता :-**

१.१) उमेदवारांने **एम.बी.बी.एस.पदवी** पास केलेली असावी.तसेच त्यांचे **महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिल ॲक्ट १९६५** नुसार कायम नोंदणी (Registration) केलेली असावी.

१.२) आंतरवासिता प्रशिक्षण समाधानकारक पूर्ण केलेले असावे.

१.३) प्रबंधक पदासाठी **आवासी भिषकाची एक वर्षाची सेवा** किंवा **त्यापेक्षा जास्त** सेवा **संबंधित विषयातील विभागात** पूर्ण केलेली असावीत.

१.४) सदरील रिक्त पदांवर बंधपत्रीत उमेदवारांचीच निवड करण्यात येईल. बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त राहीलेल्या पदांवर अबंधपत्रित उमेदवारांचा विचार केला जाईल.

१.५)पदव्यूत्तर उमेदवारास अध्यापन व रुग्णसेवेच्या दृष्टीने विशेष प्राधान्य देण्यात येईल.

**२) अर्ज मिळण्याचे ठिकाण :-**

आवासी निवासी विभाग, मा.अधिष्ठाता यांचे कार्यालय, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नादेड येथे कार्यालयीन वेळेत मिळतील त्यासाठी रोखपाल यांच्याकडे रोखीने रु.२००/- शुल्क भरावा लागेल.

**३) प्रबंधक पदासाठीचे अर्ज मिळण्याचा कालावधी :-**

दि.०२.०२.२०२६ ते दि.०९.०२.२०२६ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते दु.०१.३० व दुपारी ०२.३० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयात मिळतील.

**४) प्रबंधक पदासाठीचे अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख :-**

दि.०९.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत या महाविद्यालयाच्या आवासी निवासी विभागात स्विकारण्यात येईल. सायंकाळी.०५.०० वा. च्या नंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

**५) प्रबंधक पदासाठीची मुलाखत दिनांक :-**

५.१) प्रबंधक पदासाठीची मुलाखत **दि.२४.०२.२०२६ मंगळवार रोजी दूपारी १२.०० वाजता** या कालावधीमध्ये मा.अधिष्ठाता,डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी नांदेड यांच्या दालनात घेण्यात येईल.

५.२) मुलाखतीसाठी उमेदवारांना वेगळे पत्र पाठविले जाणार नाहीत.

५.३) मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे (Original-Certificates) सादर करणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

५.४) मुलाखतीस स्वखर्चाने हजर राहावे लागेल त्यासाठी कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

५.५) मुलाखतीच्या वेळेस उमेदवाराला स्वत: हजर रहावे लागेल उमेदवार अनुपस्थीत असल्यास त्यांच्या ऐवजी कोणत्याही कारणाने उमेदवाराचे नातेवाईक अथवा प्रतिनिधी यांना मुलाखतीस हजर राहता येणार नाही.

६) **प्रबंधक पदासाठीचे अटी व शर्ती :-**

६.१) उमेदवाराने अर्जासोबत सर्व कागदपत्रांच्या सांक्षाकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

६.२) अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावा लागेल.अर्ज विहीत नमुन्यात नसल्यास किंवा अर्ज अपूर्ण असल्यास अर्ज स्विकारले जाणार नाही.

६.३) उमेदवार जर सध्या कोणत्याही ठिकाणी सेवेमध्ये कार्यरत असेल तर त्यांनी त्या विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र(NOC) सादर करणे बंधनकारक आहे.

६.४) उमेदवार मागासवर्गीय असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र,जातवैधता प्रमाणपत्र,तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे चालू वर्षाचे (Non Creamy layer) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच EWS प्रवर्गासाठी शासनाने विहीत केलेल्या नमुन्यात त्या संबंधिचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

६.५) उमेदवाराने कामावर रुजू होते वेळी एक महिन्याच्या मासिक विद्यावेतना एवढी रक्कम अनामत रक्कम (Caution Deposit) म्हणून रोखपाल यांच्याकडे भरणा करावी लागेल. तसेच पावतीची नोंद आवासी निवासी विभागाकडे करावी.अनामत रक्कम भरणा केल्या शिवाय कामावर रुजू करुन घेतले जाणार नाही.

६.६) उमेदवारास जर काही कारणास्तव राजीनामा द्यावा लागत असले तर एक महिना अगोदर पूर्व सूचना(Intimation) विभाग प्रमुखांमार्फत या कार्यालयास सादर करावी लागेल. अन्यथा भरणा केलेली अनामत रक्कम (Caution Deposit) शासनखाती जमा करण्यात येईल.

६.७) वरील सर्व जागा पूर्ण वेळ आहेत.निवड झालेल्या उमेदवाराने २४ तास रुग्णालय परिसरात असणे बंधनकारक राहील. तसेच उमेदवारांनी त्यांच्या राहण्याची सोय स्वत: करणे आवश्यक आहे.

६.८) अंतीम निवड झालेल्या उमेदवारांना खाजगी संस्थेत,मंडळ,निमशासकीय कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारची नोकरी स्विकारता येणार नाही किंवा खाजगी व्यवसाय करता येणार नाही जर तसे कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

६.९) **मार्च-२०२६ ते ऑगस्ट-२०२६** या कालावधीत मा.संचालनालयाकडून बंधपत्रित उमेदवारांची नियुक्ती संबंधित विभागात प्रबंधक या पदावर झाल्यास, ज्या बंधपत्रित/अबंधपत्रित उमेदवारांना या महाविद्यालयात तात्पूरत्या स्वरुपात नियूक्ती देण्यात आलेली आहे. अशा उमेदवाराला कूठलीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती तात्काळ समाप्त होईल.

६.९) **सदर पदांच्या संख्येत बदल करण्याचे/जाहीरात रद्द करण्याचे तसेच सदर पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची सेवा समाधानकारक नसल्यास किंवा ईतर कुठल्याही कारणामूळे,दिलेले नियुक्ती आदेश पूर्वसुचने शिवाय समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहे.**

६.१०) **प्रबंधक पदासाठी उमेदवारास एकच अर्ज भरता येईल.**

७) **निवड प्रक्रिया :-**

७.१) उमेदवाराने ज्या विभागासाठी अर्ज सादर कलेला आहे.त्या विभागासाठी आवश्यक असणाऱ्या विषयातील गुण, संबंधीत विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा पदविका यांचे गुण,आवश्यक तो अनुभव व सबंधीत विषय उत्तीर्ण होण्यासाठी लागलेले प्रयत्न यांच्या आधारे उमेदवारांची निवड करण्यात येईल.

७.२) उमेदवाराची निवड **दि.२६.०६.१९७१ व दि.०८.१२.१९७१** च्या **शा.नि.**नुसार करण्यात येईल.

७.३) **प्रबंधक पदासाठी (मूळ विद्यावेतन रु.६६०० + महागाई विद्यावेतन रु.३३०० + शासनाच्या नियमा नुसार वेळोवेळी अंमलात येणारा महागाई भत्ता + अतिरिक्त महागाई विद्यावेतन रु.७००० + + ठोक रक्कम रु.३००००) प्रमाणे विद्यावेतन अनुज्ञेय राहील.**

**(डॉ.सुधीर भा.देशमुख)**
**अधिष्ठाता,**
**डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**विष्णुपूरी,नांदेड**

प्रति,

**सूचना फलक,**
**डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,विष्णुपूरी,नांदेड.**

प्रत:- १) मा.आयुक्त(वैद्यकीय शिक्षण),वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) संबंधित विभाग प्रमुख, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड
३) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य यांना सुचना फलकावर लावण्यास सस्नेह सादर.

Scanned with OKEN Scanner